

गुरु संत रैदास | छ. शिवाजी महाराज | राष्ट्रपिता जोतीराव फुले | राजर्षि शाहूजी महाराज | जननायक बिरसा मुंडा | पेरियार ई. वी. रामासामी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# मूलनिवासी अधिकार परिषद

## दिनांक: २२ मे २०१० (शनिवार)
## वेळ: सायं. ५.०० वाजता

## स्थान:
## प्राकृतिक मैदान, टी.व्ही. सेंटर,
## नवीन औरंगाबाद - ४३१००५

## वक्तागण

**मा. यु. एन. शिंगाडे,** *राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ पेन्शनर्स संघ*
**प्रा. सुमन तिरपुडे,** *राष्ट्रीय अध्यक्षा, बामसेफ महिला विंग*
**डॉ. पी. डी. सत्यपाल,** *राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ टिचर्स विंग*
**डॉ. मनिषा बांगर,** *राष्ट्रीय अध्यक्षा, मूलनिवासी महिला संघ*
**मा. धनंजय झाकर्डे,** *राष्ट्रीय अध्यक्ष, मूलनिवासी साहित्य व सांस्कृतिक संघ*
**मा. संजय इंगोले,** *राष्ट्रीय अध्यक्ष, मूलनिवासी संघ (विद्यार्थी आणि युवक)*

## अध्यक्षता

**मा. एस. एफ. गंगाचणे, राष्ट्रीय प्रचारक, बामसेफ**

---

## अपील

भारतीय राज्यघटनेत मूलनिवासी बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक आदि विकासाकरीता तरतुदी असतांना देखील, मूलनिवासी बहुजन समाज असंख्य समस्यांना तोंड देत आहे. भुखबळी, शेतक-यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, आरोग्य व शैक्षणिक समस्येत मूलनिवासी बहुजन समाजाचे बहुसंख्य लोक आजही अत्यंत हालाखीचे जीवन जगत आहेत.

जर या समस्यांचे विश्लेषण केले तर हाच निष्कर्ष निघतो की या समस्या

त्यांच्या आर्थिक स्थितीशी निगडीत आहेत. बहुसंख्य लोकांना रोजगार नाही आणि त्यामुळे ते आपल्या मुलाबाळांच्या आरोग्य आणि शिक्षाणाबाबत योग्य ती काळजी घेऊ शकत नाहीत. जर गेल्या दशकात भारताची आर्थिक स्थिती ७.५ टक्के दराने वाढत आहे तर भारताच्या बहुसंख्य नागरीकांना अशी भयावह भूकबळी सारखी स्थिती का भोगावी लागत आहे? यावर आमचे उत्तर असे आहे की भारताच्या आर्थिक प्रगतीचा लाभ मूलनिवासी बहुजन समाजापर्यंत पोहचतच नाही. भारतीय राज्यघटनेने मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून या देशातील साधन संपत्तीत मूलनिवासी बहुजन समाजाला समान वाटा दिला आहे. एवढेच नाही तर याकरीता योग्य धोरण आखावे असे भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शासनकर्त्यांना निर्देश दिलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने देखील असे नमूद केले आहे की या देशातील साधनसंपत्ती येथील नागरिकांमध्ये सम प्रमाणात वाटली पाहिजे. परंतु शासक जातीचे लोक संविधानावर अंमल करण्यास अजिबात इच्छूक नाहीत. म्हणूनच संविधानात मूलनिवासी बहुजन समाजाच्या हितासाठी मोठयाप्रमाणात तरतुदी असतांना देखील मूलनिवासी बहुजन समाज हा गरीबच राहिला आहे, आणि एक सन्मानजनक जीवन जगण्यापासून कायम वंचित राहिला आहे. या सर्व समस्यांना कोण जबाबदार आहे हे निश्चित करणे आज अत्यंत आवश्यक आहे.

## आपल्या समस्यांना जबाबदार कोण?

लोकशाही मध्ये जनतेच्या सेवेसाठी निवडून दिलेल्या शासनास लोक नेहमी जबाबदार मानत असतात. दूसरीकडे जनता आपल्या समस्यांवर मात करण्यासाठी असहाय्य असते. आम्हाला असे वाटते की या देशात जो काही वाईट राज्यकारभार सुरु आहे त्याकरीता आपण लोकच जबाबदार आहोत. कारण आपले प्रतिनिधी निवडून पाठवितांना आपण योग्य ती खबरदारी घेत नाही. जेव्हा शासक जातीचे लोक आपल्याकडे आपली मते मागण्यासाठी येतात तेव्हा ते आपल्याला चंद्र देण्याची आश्वासने देतात. पण ते जेव्हा निवडून येतात तेव्हा बरोबर आपल्या विरोधात काम करतात. सत्तेत आल्याबरोबर ते त्यांच्या वर्गाच्या व भांडवलदा-यांच्या हिताच्या योजना व कायदे बनवितात. परंतु आपण सर्व लोक अंधारात राहतो. प्रस्तुत मूलनिवासी अधिकार परिषदेत आपण मूलनिवासी बहुजन समाजाच्या तीन मूलभूत विषयांवर लक्ष केंद्रीत करणार आहोत.

१. रोजगार, २. आरोग्य, आणि ३. शिक्षण

हे तीनही विषय परस्परसंबंधित आहेत. याचबरोबर हे तिनही विषय प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक जीवनात फार महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या शिक्षण आणि आरोग्यासाठी लागणारा खर्च करण्याची क्षमता आपल्याला रोजगारामधूनच प्राप्त होत असते. जर आपल्याला रोजगारच मिळाला नाही तर आपण आपल्या कुटुंबातील मुलांच्या चांगले शिक्षण्याबाबत व आरोग्याबाबत काही करु शकतो हे विसरुन जावे लागेल कारण जर आपल्याला रोजगारच नसेल तर आपण दोनचतकोर भाकरी मिळविण्याच्या देखील स्थितीत राहणार नाही.

# रोजगाराचे धोरण

जेव्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकार सत्तेत आले तेव्हा त्यांनी प्रशासनातील १० टक्के नोक-या कमी केल्या. त्यामुळे प्रशासनातील वर्ग क व ड सेवेतील नोक-या मोठया प्रमाणावर नष्ट झाल्या. मूलनिवासी बहुजन समाजातील बहुसंख्य लोक हे त्यांच्या कमी शिक्षणामुळे व ग्रामिण जीवनपार्श्वभूमीमूळे याच वर्ग क व ड मधील सेवांमध्ये कार्यरत आहेत. आणि या सर्व नोक-या कमी करुन, एनडीए च्या शासनाने ६ लाख कुटुंबे आणि जवळपास ३० ते ४० लाख लोकांना त्यांच्या उपजीविकेपासून वंचित केले आहे.

रालोआ सरकार ने सेझ २००२ चा कायदा तयार केला आणि संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) सरकारने नंतर २००५ मध्ये ह्याच 'सेझ' च्या कायद्यात सुधारणा करुन तो पास केला. या कायद्यानुसार म्हटले आहे की विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजेच स्पेशल इकॉनॉमिक झोन मध्ये मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होतील. असे सांगून सेझ साठी शेकडो-हजारो हेक्टर सूपिक जमीन ताब्यात घेण्यात आली. यामुळे ६० टक्के लोक ज्यांची उपजीविका शेतीवर चालते, त्यांची शेतीही गेली आणि रोजगारदेखील बंद झाला. या सेझ मुळे देशात अन्नधान्याची भीषण टंचाई देखील निर्माण झाली आहे. एकीकडे रोजगार नाही त्यामुळे दोनचतकोर भाकरीसाठी धान्य खरेदी करण्याची क्षमता उरली नाही व दूसरीकडे अन्नधान्याच्या किमती प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे मूलनिवासी बहुजन समाजासमोर भुकेने मरण्याखेरीज कोणताही उपाय उरलेला नाही.

एकीकडे भांडवलदारासाठी सरकारची धडपड सुरु आहे तर दूसरीकडे औद्योगिक क्षेत्रात 'हायर ॲण्ड फायर' या तत्वाचा अंमल होत आहे. मूलनिवासी बहुजन समाजातील लोक हे औद्योगिक क्षेत्रात काम करीत आहेत परंतु त्यांची नोकरी किती दिवस राहिल याची कोणतीच शक्यता नाही. कारण औद्योगिक कायद्यामध्ये बदल करुन आता कंपनी मालकांकडे अधिक अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे कंपनी मालक त्यांना पाहिजे तेव्हा केव्हाही कामगार भरती करु शकतात व केव्हाही त्यांना कामावरुन काढू शकतात. यामुळे केवळ कामगाराचेच व्यक्तीगत जीवन धोक्यात आले आहे असे नाही तर संपुर्ण कुटुंबाचेच जीवन धोक्यात आहे. अशा परिस्थिती हा कंपनीमध्ये काम करणारा आपला मूलनिवासी व्यक्ती आपल्या कुटुंबातील मुलाबाळांच्या आरोग्य, शिक्षण व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी काहीच करु शकत नाही.

# शिक्षण धोरण

राष्ट्रपिता जोतीराव फुलेंनी म्हंटलेच आहे की अविद्या ही आपल्या सर्व जीवनातील समस्यांचे, दुःखाचे कारण आहे. बाबासाहेब डॉ. आंबेडकरांनी म्हंटले आहे की ज्ञान ही दुधारी तलवार आहे. शिक्षण हे लोकांना आपल्या मुक्तीची साधने पुरवते.

आपण जर आपला इतिहास बघितला तर हेच दिसते की आपले पुर्वज हे ज्ञानी होते. व ब्राह्मणवादी लोकदेखील शिक्षणाचे महत्व जाणून होते. म्हणून ब्राह्मणवादी

लोकांनी मूलनिवासियांचे राज्य हस्तगत केल्याबरोबर सर्वप्रथम आम्हा मूलनिवासियांना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित केले. म्हणूनच बाबसाहेब आंबेडकरांनी आपल्याला शिक्षण मिळावे अशा तरतुदी संविधानात करुन त्यावर अंमल करणे हे शासनकर्त्यांना बंधनकारक केले. यामुळेच स्वातंत्र्यानंतर मूलनिवासी बहुजन समाजाच्या पहिल्या पीढीला शिक्षण मिळू शकले व ते प्रशासनात अधिकारपदावर पोहचू शकले. आता शासनकर्त्यांनी त्यांची ही संवैधानिक जबाबदारी झटकली आहे आणि प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षणाच्या व्यवस्थेचे खाजगीकरण करुन टाकले आहे. शासकजातींचे लोक केवळ एवढे करुनच थांबले नाहीत तर त्यांनी देशाच्या बजेटमध्ये शिक्षणावर अत्यंत कमी खर्च करण्याचे धोरण अवलंबिले. आज देशातील एकूण दरडोई उत्पन्नाच्या केवळ ३ टक्के खर्च केला जात आहे व दूसरीकडे मूलनिवासी बहुजन समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या उत्पन्नापैकी ७० टक्के खर्च हा केवळ आपल्या मुलांच्या माध्यमिक शिक्षणावर करावा लागत आहे. अशा स्थितीत उच्चशिक्षण हे तर त्यांच्यासाठी दिवास्वप्नच आहे. परिणामी केवळ शिक्षणासाठी खर्च करु शकत नसल्यामुळेच अनेकांनी उच्चशिक्षण सोडून दिलेले आहे. ब्राह्मणवादी लोक हे आता अत्यंत सक्रिय झालेले आहेत व आपल्याला शिक्षणापासून वंचित करण्यासाठी हरएक प्रयत्न करीत आहेत. कारण स्वातंत्र्यानंतर गेल्या ५० वर्षांमध्येच शिक्षणाच्या जोरावरच आपण त्यांच्या वर्गवर्चस्वाला आव्हान दिलेले आहे.

# आरोग्य धोरण

आरोग्य हीच संपत्ती आहे अशा अर्थाची एक म्हण आहे, अर्थात जर आरोग्य चांगले असेल तरच आपल्या कुटुंबाकडे साधनसंपत्ती येऊ शकते. या देशात ९० टक्के लोक हे शेती व्यवसाय, उद्योगधंदे व अन्य सेवाक्षेत्रामध्ये रोजगार करतात आणि एकूण सकल वार्षिक उत्पन्नाचा ६० टक्के वाटा हा या क्षेत्रातून येत असतो. या देशातील सकल वार्षिक उत्पन्न हे ४० लाख करोड इतके आहे. त्यामुळे शेती व्यवसायात, उद्योगधंद्यामधील कामगार हे न केवळ आपल्या कुटुंबाचे भरणपोषण करतात तर ते या देशाच्या साधनसंपत्तीमध्ये मोठयाप्रमाणावर भर टाकत असतात. असे असले तरही भारत हा जगाच्या आरोग्य सुचीमध्ये सातव्या क्रमांकावर आहे आणि आपल्या सकल वार्षिक उत्पन्नाच्या केवळ १ टक्के निधी (४०००० करोड रुपये) आरोग्यासाठी खर्च करीत असते. अर्थात प्रत्येक व्यक्तीमागे एका वर्षाला केवळ ४०० रुपये खर्च शासन करीत आहे. जेव्हा अशाप्रकारे आरोग्यव्यवस्थेवर अत्यंत कमी खर्च केल्यामुळे मूलनिवासी बहुजन समाजाला अत्यंत कमी दर्जाची औषधे आरोग्य केंद्रातून दिली जातात, आतातर रोग्यांना त्यांच्या विविध प्रकारच्या औषधांसाठी व शस्त्रक्रियांसाठी वेगळा खर्च आकारला जातो. भारतात आरोग्यावर जो एकूण खर्च होतो त्यापैकी ७० टक्के खर्च हा येथील जनता स्वतःच करते व फक्त ३० टक्के खर्च शासन उचलते. असे असूनही या देशात ९९ टक्के मूलनिवासी बहुजन समाज हा आरोग्य सेवेच्या व्यवस्थेपासून वंचित आहे.

१. सरकार आपल्या जीडीपीच्या केवळ १ टक्के निधी हा नागरिकांच्या आरोग्य सेवेवर खर्च करते. हा दरडोई खर्च केवळ २१४ रुपये आहे तर प्रत्येक व्यक्ती

आपल्या खिशातून रुपये ७६० खर्च करीत आहे.

२. सन २००४ पासून आजपर्यंतची आकडेवारी आपण बघितली तर केंद्र सरकार ने आपल्या बजेट मध्ये नागरिकांच्या आरोग्य सेवेवर केवळ १.५ ते २.२ टक्के इतकाच निधी दिलेला आहे. दूसरीकडे १५ टक्के इतका निधी हा डिफेन्सवर खर्च केला जातो.

३. सन २००२ पासून आरोग्य व कुटुंब कल्याणावरील खर्च कमी कमी होत गेलेला आहे. आपल्या बजेट मध्ये आरोग्य सेवेला अत्यंत शेवटचे स्थान दिलेले आहे.

४. सार्वजनिक सेवेतील खर्चाच्या तूलनेत आरोग्यावरील खर्च हा सन २००२ पासून २००८-०९ पर्यंत १३ टक्क्यांवरुन ११ टक्क्यांवर आलेला आहे.

५. संसर्गजन्य रोगांपासून जनतेची सुरक्षा करण्यासाठी राष्ट्रीय रोगप्रतिबंधक कार्यक्रमामार्फत काम केले जाते अशा योजनांवर यादेशात सातत्याने खर्च कमी-कमी केला जात आहे आणि आवश्यकतेपेक्षा जास्त खर्च एचआयव्ही आणि एड्स सारख्या रोगांवर खर्च करण्यात येत आहे.

६. राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य कार्यक्रमामध्ये अत्यंत धीम्या गतीने अंमल व खर्च होत आहे. संपुर्ण आरोग्य सेवेला सक्षम करण्यासाठी त्याचे विकेंद्रीकरण करणे, गावांतील आरोग्य केंद्रांमध्ये, आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करणे आवश्यक आहे, परंतु तसे जाणीवपूर्वक होत नाही.

७. प्रत्यक्ष आरोग्य सेवा सारखे प्रकल्प आता काही दूर नाहीत. गरीबी रेषेखालील लोकांना जो आरोग्याचा विमा देण्याच्या व्यवस्थेला पर्याय म्हणून अशा योजना सुरु करण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून लोक-सार्वजनिक व खाजगी भागीदारी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) या नावाखाली खाजगी आरोग्य संस्थांना सरकार प्रोत्साहन देत आहे. अशाप्रकारची खाजगी गुंतवणूक म्हणजे खर्चातून कपात करण्याचाच एक भाग आहे.

८. खाजगी आरोग्य संस्थांवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही.

९. राष्ट्रीय आरोग्य विमा योजना सारखे कार्यक्रम हे केवळ जनतेच्या डोळयात धूळफेक करणारे आहे. कारण या कार्यक्रमाअंतर्गत केवळ ४५ लाख बीपीएल कुटुंबांपुरतीच मर्यादित राहिली आहे जेव्हा की या देशात ६.५ करोड बीपीएल कुटुंबे ही या योजनेअंतर्गत येतात परंतु त्यांना त्याचा लाभ मिळत नाही.

१०. गरीबी रेषेखालील लोंकाच्या अभ्यासासाठी बनलेल्या 'एन. सी. सक्सेना समिती'नुसार या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या ही गरीबी रेषेखाली येते.

अशाप्रकारे कोणतीच योजना अथवा कार्यक्रम हा या देशातील बहुसंख्यांकाकडे पोहचत नाही. त्यामुळे अशा अत्यंत नीचपणाला पोहचलेल्या व्यवस्थेला बदलून टाकण्याची अत्यंत तातडीची गरज आहे.

त्याचबरोबर आरोग्य सेवा व्यवस्थेमध्ये सार्वजनिक गुंतवणुक वाढविणे हे अत्यंत महत्वाचे पाऊल ठरेल. शासकजातींकडून जी काही वरवरची सहानुभूती दाखविली जाते ती केवळ दिखावा आहे. म्हणून मूलनिवासी बहुजन समाजाला मोठयाप्रमाणावर जागृत करुन जनआंदोलन उभारणे अत्यंत आवश्यक आहे. शासक जातींचे लोक जे खऱ्या अर्थाने अल्प संख्यंक आहेत त्यांच्यावर दबाव निर्माण करणे आवश्यक आहे. जेवढी ही बाब आरोग्य क्षेत्राबाबत आहे तेवढीच ही बाब सामाजिक क्षेत्रालाही लागू आहे.

## उपाय-योजना

आपल्या असे लक्षात आले असेल की जरी भारतीय संविधानाने येथील नागरिकांना समानता प्रदान केली असली तरी शासक जातीचे लोक हे सर्व पातळयांवर नियंत्रण ठेवून मूलनिवासी बहुजन समाजाला अधिकार देऊ इच्छित नाहीत. मूलनिवासी बहुजन समाजाच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात अर्थात रोजगार, शिक्षण, आरोगय आणि इतर सर्व सामाजिक क्षेत्रांमध्ये पदोपदी शासक जातींचे लोक नियंत्रण करीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हंटले आहे की जर तुम्हाला अधिकार पाहिजे असतील तर तुम्हाला त्यासाठी संघर्ष करावा लागेल. संघर्ष करण्यासाठी आपल्याकडे क्षमता अर्थात शक्तीची आवश्यकता आहे. ही शक्ती आपण केवळ संघटना बांधूनच प्राप्त करु शकतो. आणखी एके ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असेही म्हंटले आहे की एकवेळ अशी येईल आपण ज्याला आपले अधिकार समझतो ते सगळे अधिकार जातील, आपलेच नव्हे तर इतरांचेही अधिकार जातील त्यावेळेस आपल्याला आपल्या संघटनेच्या शक्तीवर व एकतेवरच निर्भर रहावे लागेल. म्हणून आपल्याला आपल्या हक्क-अधिकारांसाठी निर्धारपुर्वक एकत्र येऊन संघर्ष करावा लागेल. मूलनिवासी संघ, मूलनिवासी महिला संघ, मूलनिवासी साहित्य व सांस्कृतिक संघ, बामसेफ टिचर्स संघ, बामसेफ पेन्शनर्स संघ, बामसेफ महिला विंग यांनी मूलनिवासी बहुजन समाजाच्या या समस्या सोडविण्यासाठी शासक जातींसोबत संघर्ष करण्याचे ठरविले आहे. याकरीता मे २०१० पासून औरंगाबाद येथून मूलनिवासी अधिकार परिषदेचे आयोजन करुन जनआंदोलनाची सुरुवात करण्यात येत आहे. एका वर्षाच्या आत हे सर्व विषय राष्ट्रीय स्तरावर उचलले जातील. या सर्व बाबी लक्षात घेऊन मूलनिवासी बहुजन समाजाला विनंती आहे की त्यांनी या मूलनिवासी अधिकार परिषदेत तन-मन-धना सहित बहुसंख्येने सहभागी व्हावे. धन्यवाद! जय भीम! जय मूलनिवासी!!

**विनीत**

**संजय इंगोले,** सचिव, बामसेफ ऑफशूट विंग्ज

---

**औरंगाबाद संपर्क कार्यालय**

६३, जवाहर कॉलनी परिसर, न्यू शांती निकेतन कॉलनी, औरंगाबाद -४३१००१
**संपर्कः ॲड. विजय वानखेडे (मो. ९४२३७४१८१५), जीवन गावंडे (मो. ९२०९६७९४००)**

---